क्र.२/सभा/प्रशासक/ ०६/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०६ नोव्हेंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०६/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपो मध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत केलेल्या कामाची स्थळ पहाणी करणे व पुढील कामकाजाचे नियोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरिता **मंगळवार दि.०७/११/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली येथील हनुमाननगर जुना स.नं.३३४/१,३३४/२,३३४/३ नविन स.नं.७१/१,७१/२,७१/३ या जागेमध्ये महानगरपालिकेचे नविन नाट्यगृहाचे बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेकामी वास्तुविशारद श्री.कन्सल्टन्स,मुंबई यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्र.**

३. सन २०२३-२४,मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ३९ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील र.रु.३.१० कोटी ची २४ कामे बदलून सदर कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्र.**

४. सन २०२३-२४,मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०७ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील र.रु.२.५० कोटी ची ०२ कामे बदलून सदर कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४ दिनांक :- ०७/११/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०६ दि.०७/११/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह,सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त	४.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
५.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक	६.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
७.	श्री.विनय झगडे – स.स.न.र	८.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
९.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी	१०.	श्री.चिदानंद कुरणे-कार्यकारी अभियंता,पा.पु./जल.वि.सां./मि.
११.	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३	१२.	श्री.परमेश्वर हलकुडे - नगर अभियंता,सांगली
१३.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष	१४.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता
१५.	श्री.बुचडे – प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग	१६.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
१७.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक	१८.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर
१९.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२०.	श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजि.वर्कशॉप मिरज
२१.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२२.	श्री.जेलर – क्रिडा अधिकारी
२३.	श्री.गुजराथी– पर्यावरण अभियंता, आरोग्य विभाग	२४.	श्री.किल्लेदार – घनकचरा प्रकल्प अधिकारी

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीचे सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत सांगली येथील हनुमाननगर जुना स.नं.३३४/१,३३४/२,३३४/३ नविन स.नं.७१/१,७१/२,७१/३ या जागेमध्ये महानगरपालिकेचे नविन नाट्यगृहाचे बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेकामी वास्तुविशारद श्री.कन्सल्टन्स,मुंबई यांची नियुक्ती करणेस मान्यता देणे.

प्रशासक विषय मंजूर

विषय क्र. ०३ सन २०२३-२४,मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ३९ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील र.रु.३.१० कोटी ची २४ कामे बदलून सदर कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.

प्रशासक विषय मंजूर

विषय क्र. ०४ सन २०२३-२४,मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०७ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील र.रु.२.५० कोटी ची ०२ कामे बदलून सदर कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.

प्रशासक विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०७/११/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१६ ते ठराव क्र.१९ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाव्यवस्थापक.

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २१ **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२३-२४, मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील हनुमाननगर जुना स.नं.३३४/१,३३४/२,३३४/३ नविन स.नं.७१/१,७१/२,७१/३ या जागेमध्ये महानगरपालिकेचे नविन नाट्यगृहाचे बांधकाम करणेकामी र.रु.२५ कोटी मात्र मंजूर झालेले असून, सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेकामी महापालिका वास्तुविशारद पॅनलरील वास्तुविशारद श्री.प्रमोद चौगुले, सांगली यांची मा.आयुक्तसो यांच्या मान्यतेस अनुसरुन नियुक्ती करणेत येवून, त्यांना दि.०३/१०/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे. त्यानुसार श्री.प्रमोद चौगुले यांनी नाट्यगृह बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार केलेले आहेत. त्यानुसार प्रशासकीय मान्यता मिळून निधी मंजूर होणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. दरम्यान मा.आमदार श्री.धनंजय ऊर्फ सुधीरदादा गाडगीळ यांनी सदर नाट्यगृह बांधकामासाठी वास्तुविशारद म्हणून श्री.कन्सल्टन्स,मुंबई यांची नियुक्ती करणेस सूचित केलेले आहे. त्यानुसार महापालिकेच्या नविन नाट्यगृह बांधकाम करणेसाठी वास्तुविशारद म्हणून श्री.कन्सल्टन्स,मुंबई यांची नियुक्ती करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २२ **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.मनपा-२०२३ /प्र.क्र.३२८(२४)/नवि-१६ दि.२५/०७/२०२३ अन्वये सन २०२३-२४ सालाकरीता मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ३९ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्ताव मंजूर असून, सदर कामाची कार्यान्वीयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे.

महासभा ठराव क्र.६५३ दि.१७/०८/२०२३ अन्वये ३९ कामांचा र.रु.१० कोटी मात्रचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तथापि, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन शुद्धीपत्रक क्र.मनपा-२०२३/ प्र.क्र.३२८(२४) / नवि-१६ दि.२५/१०/२०२३ अन्वये मंजूर ३९ कामापैकी अ.क्र.८,१९,२०,२३,२६,२८, ३१,३२,३४,३५व ३९ ही कामे रद्द करुन, खालील नमुद २४ कामांचा र.रु.३.१० कोटी मात्रच्या कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रु. (लक्ष)
१.	प्रभाग क्र.६ शमा सायकल ते गाड घर रस्ता ट्रिमिक्स करणे	१५.००
२.	प्रभाग क्र.६गाड घर ते सरपंच घर रस्ता ४ इंची ट्रिमिक्स ने दुरुस्ती करणे	१०.००
३.	प्रभाग क्र.६व्ही.बाबासो ते जब्बर वखार ट्रिमिक्सरस्ता ४ इंचीने दुरुस्त करणे	१०.००
४.	प्रभाग क्र.६महाराष्ट्र बेकरी ते वडू घर रस्ता BM AC करणे.	२०.००
५.	प्रभाग क्र.२० जूना हरिपुर रस्ता, जयहिंद्र कॉलनी मधील अंतर्गत रस्ते कॉक्रिटीकरण करणे	१०.००

६.	प्रभाग क्र.४ जेष्ठ नागरिक संघ येथे महिला व पुरुष प्रसाधन गृह बांधणे व सुशोभिकरण करणे	१७.००
७.	प्रभाग क्र.४ मध्ये केळकर योग वर्ग योग मंदिर सुशोभिकरण करणे	
८.	प्रभाग क्र.२० खतीब हॉलच्या पुर्वकडील क्रिडांगणात लादीकरण करणे	१०.००
९.	प्रभाग क्र.२ मध्ये विद्यानगर येथे गणपती मंदिर सुशोभिकरण करणे	१०.००
१०.	प्रभाग क्र.५ मधील बोलवाड रोड स्वामी समर्थ पार्क अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे	१५.००
११.	प्रभाग क्र.५ मधील अभिनंदन कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे	१५.००
१२.	प्रभाग क्र.५ मधील कृष्णाघाट रोड वरील येवारे मळा जवळ रस्ता कॉक्रिटीकरण करणे	१५.००
१३.	प्रभाग क्र.५ किल्ला भाग गोलंदाज मशिद समोरील बोळ पेव्हींग ब्लॉक बसविणे	
१४.	प्रभाग क्र.५ मधील मंडले प्लॉट अंतर्गत रस्ते करणे	
१५.	प्रभाग क्र.५ मधील म्हैशाळ रोड येवारे मळाजवळील महादेव मंदिर परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे	२८.००
१६.	प्रभाग क्र.२ गुलमोहर कॉलनी, गणपती मंदिरासमोर सभा मंडप बांधणे	
१७.	प्रभाग क्र.२ कुपवाड श्री.स्वामी समर्थ मंदिरासमोर सभा मंडप बांधणे	२०.००
१८.	प्रभाग क्र.२ साईनंदन कॉलनी साईबाबा मंदिरासमोर सभा मंडप बांधणे	२०.००
१९.	प्रभाग क्र.५ मध्ये टाकळी रोड शिवम पार्क अंतर्गत रस्ता सुधारणा करणे	१५.००
२०.	प्रभाग क्र.५ मध्ये बेडग रोड ते पुणेकर घर रस्ता सुधारणा करणे	१५.००
२१.	प्रभाग क्र.५ मध्ये कृष्णाघाट रोड एमएसइबी कॉलनी अंतर्गत रस्ते करणे	१५.००
२२.	प्रभाग क्र.२० मनपा शाळा नं.७ मिरज येथे शेड उभारणे	१०.००
२३.	प्रभाग क्र.२० कृष्णाघाट मिरज येथील कृष्णा घाटाकडे जाणारा रस्ता कॉक्रिटीकरण करणे	१०.००
२४.	प्रभाग क्र.२० प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.१०, मिरज समोरील रस्ता कॉक्रिटीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे	१०.००
	एकूण र.रु. (लक्ष)	**३१०.००**

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- २३ **दिनांक** :- ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(५४)/नवि-१६ दि.२१/०२/२०२३ अन्वये सन २०२२-२३ सालाकरीता मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०७ कामांचा र.रु.१०,००,००,०००/- मात्रच्या प्रस्ताव मंजूर असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा दि.२७/०२/२०२३ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये सार्वजनिक बांधकाम आहे.

मा.महासभा ठराव क्र.६५३ दि.१७/०८/२०२३ अन्वये एकूण ०७ कामाचा र.रु.१० कोटीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी कार्याकडे सादर करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तथापि, दि.२५/१०/२०२३ रोजीच्या शासन शुद्धीपत्रकान्वये दि.२५/०७/२०२३ च्या शासन निर्णयातील मंजूर ७ कामापैकी अ.क्र.४ हे काम रद्द करुन खालील नमुद २ कामांचा र.रु.२.५० कोटी मात्रच्या कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रु. (लक्ष)
१.	मिरज येथील बोलवाड रोड ड्रेनेज व्यवस्था करणे	१२०.००
२.	मिरज येथील बोलवाड रस्ता डांबरीकरण करणे	१३०.००
	एकूण र.रु. (लक्ष)	**२५०.००**

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका